# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि -72- /2020 दिनांक: 16 / 03 /2020

**अकोला जिल्हयातील व सर्व ग्रामिण भागातील सर्व सरकारी व खाजगी शाळा ,अंगणवाडया तसेच महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केन्द्रे व खाजगी कोचिंग क्लासेस यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत**

## *आदेश*

**वाचा -**

१. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय मुंबई दिनांक १४ मार्च, २०२०

२. उपसचिव, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे पत्र क्र. संकीर्ण - २०२०/प्र.क्र.१०१/ एसडी-४ दिनांक १४ मार्च २०२०

३. साथरोग अधिनियम,१८९७

४. या कार्यालयाचे आदेश दिनांक १४.३.२०२०

**ज्या अर्थी**, शासनाने *करोना* विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन अधिसूचना निर्गमित केली आहे. करोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा व अंगनवाडया तसेच महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केन्द्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था,साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिका-याचे मान्यतेने दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

**ज्या अर्थी,** उप सचिव, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक १४ मार्च २०२० चे पत्रान्वये सर्व महानगर पालिका, नगरपालिका व नगर पंचायत क्षेत्रातील इयत्ता १० वी व १२ वी च्या परिक्षा विहीत वेळापत्रकानूसार घेण्यात याव्यात, त्याचप्रमाणे आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्याच्या संपर्कात येणार नाही या साठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सूचना प्राप्त झाल्या आहेत. व त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, अकोला यांनी दिनांक १४.३.२०२० नुसार आदेश पारीत केले आहेत.

..2..

Nitin 747

**त्या अर्थी**, साथरोग अधिनियम १८९७ मधील खंड २,३ व ४ मधील तरतूदीनुसार मला असलेल्या अधिकारानुसार मी, **जितेन्द्र पापळकर,** भाप्रसे **जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी , अकोला** , करोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजनेचा करणे गरजेचे असल्यामुळे **अकोला जिल्हयातील व सर्व ग्रामिण भागातील सर्व सरकारी व खाजगी शाळा , अंगणवाडया तसेच महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केन्द्रे व खाजगी कोचिंग क्लासेस** यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था **दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत याद्वारे आदेश निर्गमित करीत आहे.** तसेच इयत्ता १० वी व १२ वी च्या परिक्षा विहीत वेळापत्रकानूसार घेण्यात याव्यात व आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्याच्या संपर्कात येणार नाही या साठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्यात यावी.

त्याच प्रमाणे,(1) या आदेशाद्वारे विहीत करण्यात आलेल्या कोणत्याही निर्बधांची किंवा, काढलेल्या आदेशाची अवज्ञा करणा-या कोणत्याही व्यक्तीने, भारतीय दंड संहिता, (१८६० चा ४५ ) याच्या कलम १८८ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानन्यात येईल.

सदर आदेश आज **दिनांक १६ मार्च २०२०** रोजी माझे स्वाक्षरी व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी
अकोला

**(जितेंद्र पापळकर,** भा.प्र.से.**)**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**

**प्रतिलिपी -**

१. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई
२. उपसचिव, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई
३. मा. आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.

यांना माहिती करिता सादर

४. जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अकोला.
६. अधिष्ठाता शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला
७. जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय, अकोला
८. कुलसचिव, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ, अकोला
९. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद अकोला
**१०. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक) जिल्हा परिषद अकोला**
**११. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, अकोला**
**१२. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा परिषद अकोला**

..३..

**यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव, त्यांनी उपरोक्त प्रमाणे आदेशात नमूद केल्यानुसार आपलेस्तरावरुन आदेशाची अंमलबजावणी करावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.**

१३. गट विकास अधिकारी ------------------------------ सर्व मार्फत तहसिलदार-------------

१४. मुख्याधिकारी --------------------------------- मार्फत तहसिलदार ----------------------

१५. प्राचार्य, -------------------------------------------------------------- सर्व

यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.

१६.संचालक खाजगी कोचिग क्लासेस -------------------------

१६. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी सदर माहीतीस बातमिच्या स्वरुपात व्यापक प्रसिध्दी देण्याचे दृष्टीने विनामुल्य प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
अकोला

जिल्हादंडाधिकारी अकोला